जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -२४६ दिनांक -२५/०५/२०२४**

सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## पोर्चे कारने कल्याणी नगर, येरवडा पुणे येथे केलेल्या अपघाताच्या अनुषंगाने आक्षेपार्ह व अश्लिल वक्तव्ये असलेली रिल इन्स्टाग्राम या समाजमाध्यमावर प्रसारीत केली त्याबाबत येथे दखलपात्र गुन्हा दाखल केलेबाबत.

सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुरनं ४३०/२०२४, भादवि कलम ५०९,२९४(ब) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयात सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील कर्तव्यास असलेल्या मपोउनि स्नेहल अडसूळे या दि. २३/०५/२०२४ रोजी कर्तव्यास असताना त्यांचे इन्स्टाग्राम अकाऊंट सर्फिंग करत असताना त्यांना एका इन्स्टाग्राम अकाऊंटवर कल्याणीनगर, येरवडा पुणे येथील झालेल्या अपघाताच्या अनुषंगाने समाजातील स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे व नितीभ्रष्ट करणारे अश्लिल वक्तव्ये असलेली रिल पोस्ट केल्याचे दिसून आले. म्हणून सदर रिल तयार करणारे व सदरची रिल इन्स्टाग्राम अकाऊंटवर प्रसारीत करणारे इन्स्टाग्राम अकाऊंट या दोघांविरुध्द वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयाचा तपास हा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन श्री सुरेश शिंदे, हे करीत आहेत. संबंधीत इन्स्टाग्राम कंपनीस दोन्ही इन्स्टाग्राम अकाऊंटची युआरएल तसेच वादग्रस्त रिल ची युआरएल पाठवून सविस्तर माहिती मागविण्यात आली आहे. माहिती प्राप्त होताच तीचे तांत्रिक विश्लेषण करुन गुन्हयातील मुळ आरोपीतांपर्यत पोहोचण्याकरीता प्रयत्नशील आहोत.

सदर गुन्हा दाखल करुन पुढील कारवाई मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री. अमितेश कुमार, मा. पोलीस सह आयुक्त, पुणे शहर श्री. प्रविण पवार, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,श्री. शैलेश बलकवडे, मा. पोलीस उपआयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे श्री. विक्रांत देशमुख, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे श्री.आर.एन.राजे, यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुरेश शिंदे, म.पोलीस निरीक्षक श्रीमती मिनल सुपे-पाटील व सायबर पोलीस स्टेशन कडील स्टाफ हे करीत आहेत.